# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सामनगांव रोड नाशिक-रोड ,नाशिक

☎ :0253/2461479, Fax : 2455301 ई-मेल:- ronashik.dte@gmail.com.

www.dtensk.org

---

जा.क्र.तंशि/विकाना/तांशा/२०१०/ 1190 दिनांक :- 1 JUL 2010

## परिपत्रक

**संदर्भ** :- संचालनालयाचे पत्र क्र. १०/प्रवेश/२०१०/बी दिनांक २१.६.२०१०

उपरोक्त विषयांस अनुसरून संचालनालयाने **"How to make world class polytechnic"** या विषयावरील पुस्तिका छापून विभागांतील सर्व तंत्रनिकेतनास वितरीत करण्यासाठी संदर्भिय पत्रानुसार या विभागीय कार्यालयाकडे पाठविलेल्या आहेत. तसेच प्रत्येक तंत्रनिकेतनास ३ पुस्तिका वितरीत करण्याबाबतही निर्देशित केलेले आहे. प्रत्येक पुस्तिकेची किंमत रु. ३००/- इतकी आहे. त्यानुसार विभागांतील सर्व तंत्रनिकेतनाकडून रु. ९००/- मूल्य घेउन पुस्तिकेचे वाटप करुन एकत्रित रक्कम संचालनालयास जमा करणेबाबतही या विभागीय कार्यालयास कळविलेले आहे.

त्याअनुंषगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील प्रतिनिधीस रु. ९००/- एवढी रोख रक्कम घेउन पुस्तिका घेण्यास पाठवावे. तसेच आपणांस असेही कळविण्यात येते की, सदर पुस्तिकेचा संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभ्यास करावा व पुस्तिकेतील संदर्भानुसार सर्व उपक्रमाची अंमलबजावणी संस्थेमध्ये करण्यात यावी.

(डॉ.आर.एस.नायडू)<br>
सहसंचालक<br>
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक

प्रत- सर्व प्राचार्य,शासकीय व अशासकीय विना अनुदानित,अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था, नाशिक विभाग

प्रत - प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
२/- त्यांनी सदरचे पत्र या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.